मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा! : ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.in » पुणे, पिंपरी-चिंचवड » सोमवार, दिनांक २१ ऑगस्ट २०२३। पान १

# गणेशोत्सव मंडपाच्या खड्ड्यांसाठी दर आकारणी रद्द करावी!

## भाजपा पिंपरी निवडणूक प्रमुख अमित गोरखे यांची मागणी

**पिंपरी-चिंचवड । न्यूज एक्सप्रेस मराठी ।** सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांकडून मंडप उभारणीसाठी खड्डे खोदताना दर आकारणी केली जाते. सार्वजनिक गणेश मंडळांकडून ही दर आकारणी करू नये. तसेच मनपा व पोलिस प्रशासनाने परवानगीची प्रक्रिया व नियमावली सुकर करावी, अशी मागणी भारतीय जनता पार्टीचे पिंपरी निवडणूक प्रमुख अमित गोरखे यांनी निवेदनाव्दारे केली आहे.





अमित गोरखे यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, पिंपरी चिंचवड शहरात गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना महापालिका आणि पोलिस प्रशासनाकडे विविध गोष्टींसाठी परवानगी घ्यावी लागते.

यामध्ये मनपा प्रशासन खड्डे घेण्यासाठी परवानगीबरोबर दर आकारणी करते. हे दर आकारले जाऊ नयेत. उत्सवासाठी गणेश मंडळांना ही सवलत देण्यात द्यावी.

शहरातील गणेशोत्सव शांततेत, सुरक्षित, उत्साह आणि भक्तीमय वातावरणात साजरा व्हावा. या करिता पिंपरी चिंचवड मनपा आणि पिंपरी चिंचवड पोलिस आयुक्तालयामार्फत एक खिडकी योजना राबविण्यात यावी.

यासह नियमावली सुकर करून गणेश मंडळांना सहकार्य करावे. या करिता मनपा प्रशासनाने वेळीच नियोजन करावे. गणेशोत्सव जवळ येत असल्यामुळे प्रशासनाने तातडीने यासाठी आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात, असे त्यांनी नमूद केले आहे.

### खड्डेमुक्त मंडपासाठी गणेश मंडळांनी पुढाकार घ्यावा

» गणेश मंडळाकडून मंडप उभारणीसाठी रस्त्यात खड्डे केले जातात. त्या खड्ड्यामुळे रस्त्यांची दुरावस्था होते. त्याकरिता पिंपरी चिंचवड मनपा प्रशासनाने शहरातील सर्व सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना खड्डेमुक्त मंडप उभारणीसाठी आवाहन करावे. गणेश मंडळाच्या पदाधिका-यांनी देखील खड्डेमुक्त मंडप उभारणी करण्यास प्राधान्य द्यावे, असे आवाहन अमित गोरखे यांनी मंडळांना केले आहे.

# मोरया गोसावी मंदिरातील ‘तो’ फलक हटवला!

## संभाजी ब्रिगेडचा दणका : मंदिर प्रशासनाकडून दिलगिरी

**पिंपरी-चिंचवड । न्यूज एक्सप्रेस मराठी।** छत्रपती संभाजी महाराज यांच्या अवमान प्रकरणी कायदेशीर कारवाई करण्याचा इशारा संभाजी ब्रिगेडच्या वतीने वकिलामार्फत चिंचवडगाव येथील श्री मोरया गोसावी मंदिर व्यवस्थापनाला दिला होता.




ब्रिगेडच्या दणक्यानंतर महाराजांविषयी अवमानकारक असणारा माहिती फलक अखेर हटविण्यात आला असून त्याबाबत मंदिर व्यवस्थापकाने दिलगिरी व्यक्त केल्याचे संभाजी ब्रिगेडचे शहर अध्यक्ष सतीश काळे यांना कळविले आहे. मंदिरातील माहिती फलकावर छत्रपती संभाजी महाराज यांच्याविषयी त्यांचा वध झाला असा अवमानकारक शब्द वापरला होता. त्याचा तीव्र आंदोलन करून निषेध करण्याचा इशारा संभाजी ब्रिगेडचे अध्यक्ष सतीश काळे यांनी ४ ऑगस्ट रोजी दिला होता. या इशाऱ्यानंतर मंदिर व्यवस्थापनाने वध हा शब्द हटवून बलिदान शब्दाचा समावेश केला होता. त्यावर समाधान न झाल्याने त्याविरोधात आक्रमक होत संभाजी ब्रिगेडने कायदेशीर पाऊले टाकली होती. एडवोकेट अतुल पाटील यांच्यामार्फत नोटीस पाठवून हा फलक पूर्ण काढून खरा इतिहास सांगणारा फलक लावण्याची मागणी केली होती.


### पुराव्याअभावी वादग्रस्त फलक...

» ॲड. अतुल पाटील यांच्या मार्फत नोटीस पाठविण्यात आली होती. ११ ऑगस्ट रोजी नोटीस पाठवली या माहिती फलकातील मजकुर पुर्णपणे काल्पनिक असुन कोणत्याही पुराव्यांचा अभ्यास न करता लिहीलेला आहे. सदरचा मजकुर हा माहिती फलकावर तसाच ठेवण्यात आल्यास मंदिरात येणाऱ्या कोणत्याही शिव प्रेमींची भावना दुखवली जाईल. तसेच त्यामुळे दोन समाजात जातीय तेढ निर्माण होवू शकते. त्यामुळे ही नोटीस मिळाल्यापासुन दोन दिवसांच्या आत आपल्या मंदिरात लावण्यात आलेला वर नमुद फलक त्वरीत हटविण्यात यावा, अशी मागणी केली होती. आठ दिवसाच्या आत यावर कार्यवाही करण्याची मागणी नोटीस मध्ये नमूद करण्यात आली होती. संभाजी ब्रिगेडच्या या दणक्यानंतर सदरचा माहिती फलक हटविण्यात आला असून मंदिर व्यवस्थापनाकडून दिलगिरी व्यक्त करण्यात आल्याची माहिती संभाजी ब्रिगेडचे शहराध्यक्ष सतीश काळे यांनी दिली आहे.

# गणेशोत्सवात ध्वनिक्षेपकाबाबतचे निर्बंध हटविले!

## विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांची माहिती





**पिंपरी-चिंचवड । न्यूज एक्सप्रेस मराठी।** **सार्वजनिक गणेशोत्सवात यंदा २३ ते २८ सप्टेंबर दरम्यान रात्री १२ वाजेपर्यंत ध्वनिक्षेपक वाजवण्यास सवलत दिली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी हा निर्णय घेतला आहे. तसेच गौरी विसर्जनाच्या दिवशीही रात्री उशिरापर्यंत ध्वनिक्षेपक सुरू ठेवता येईल, अशी माहिती विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी दिली.**

गणेशोत्सव, दहीहंडी उत्सवाच्या पार्श्वभूमीवर डॉ. गोऱ्हे यांनी शनिवारी दुपारी विभागीय आयुक्त कार्यालयात आयोजित बैठकीत त्या बोलत होत्या. जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख, महापालिका आयुक्त विक्रम कुमार, पुणे शहर पोलिस आयुक्त रितेश कुमार, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रमेश चव्हाण, अतिरिक्त पोलिस आयुक्त प्रवीण पाटील, उपआयुक्त संदीप गिल व आर राजा, जिल्हा पोलिस अधीक्षक अंकित गोयल, वाहतूक शाखेचे उपायुक्त विजय मगर, विभागीय उपायुक्त वर्षा उंटवाल, जिल्हा क्रीडाधिकारी महादेव कासगावडे आदी उपस्थित होते. प्रशासकीय बैठकीनंतर डॉ. गोऱ्हे यांनी शहरातील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांच्या प्रतिनिधींची बैठक घेतली. त्यांच्या समस्या त्यांनी जाणून घेतल्या. प्रशासनाबरोबर चर्चा करून या अडचणींचे निराकरण करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले. या बैठकीवर शहरातील काही मोठ्या मंडळांनी बहिष्कार टाकला होता. मंडळांच्या प्रतिनिधींना विश्वासात न घेता परस्पर नियम केल्याचा निषेध म्हणून हे प्रतिनिधी बैठकीला गेले नाहीत. शिवसेना (मुख्यमंत्री एकनाथ शिंदे) शहरप्रमुख नाना भानगिरे, सहसंपर्कप्रमुख अजय बाप्पू भोसले, युवासेना सचिव किरण साळी, तसेच नीलेश गिरमे, श्रीकांत पुजारी, महिला पदाधिकारी, गणेशोत्सव मंडळांचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

### मुंबईच्या धर्तीवर सुरक्षिततेच्या दृष्टीने मंडळांना मार्गदर्शन

» सार्वजनिक गणेश मंडळांनी मागील वर्षी उत्सवासाठी काढलेल्या परवान्यांची मुदत सन २०२६ पर्यंत असल्याने त्यांनी नव्याने अर्ज करू नयेत, मात्र ज्यांनी मागील वर्षी परवानगी घेतली नाही त्यांना नव्याने अर्ज करावा लागेल. नागरिकांनी आपल्या सूचना जिल्हाधिकारी, पुणे महापालिका आणि पोलिस आयुक्त कार्यालय यांच्याकडे द्याव्यात, असे आवाहन डॉ. गोऱ्हे यांनी केले. दहीहंडी सणाला साहसी खेळ म्हणून मान्यता देण्यात आली आहे. या अनुषंगाने मुंबईच्या धर्तीवर सुरक्षिततेच्यादृष्टीने मंडळाला मार्गदर्शनपर प्रात्यक्षिके घेण्याचे निर्देश दिले आहेत, असेही त्या म्हणाल्या.

# संतपीठ हे जीवन घडविणारे ज्ञानपीठ : हभप बाजीराव चंदिले

## संतपीठात गुरुपूजन सोहळा उत्साहात




**पिंपरी-चिंचवड । न्यूज एक्सप्रेस मराठी।** **संतपीठ हे विद्यार्थ्यांना संस्कार देणारे, त्यांचे जीवन घडवणारे ज्ञानपीठ आहे. संस्कृत, हिंदी, मराठी व इंग्रजी या चार भाषांवर प्रभुत्व मिळवून संतांची महती साता-समुद्रापार संतपीठाच्या विद्यार्थ्यांनी पोहोचवावी, ही हभप राजू महाराज ढोरे यांची इच्छा आहे, असे मत हभप बाजीराव चंदिले यांनी व्यक्त केले.**

जगद्गुरु संत तुकाराम महाराज संतपीठाच्या मुक्त संगीत शिक्षण विभागाच्या वतीने आयोजित गुरुपूजन सोहळा उत्साहात पार पडला. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी हभप पुरुषोत्तम महाराज मोरे (अध्यक्ष-देहु संस्थान), हभप बाजीराव चंदिले (सरचिटणीस तथा अध्यापक वा.शि.सं. आळंदी), हभप प्रमोद महाराज जगताप (वाणीभूषण बारामती, अभ्यासक संतपीठ), हभप स्वामी हनुमान चैतन्य (अध्यापक वा.शि. संस्था, आळंदी), विजय थोरात (सहायक आयुक्त शिक्षण विभाग), डॉ. भावार्थ देखणे (सदस्य सांस्कृतिक समिती संतपीठ), माजी नगरसेवक कुंदन गायकवाड, माजी स्विकृत सदस्य संतोष मोरे व दिनेश यादव, मुक्त संगीत शिक्षण विभाग प्रमुख तसेच संतपीठ संचालक हभप राजू महाराज ढोरे, डॉ. स्वाती मुळे आदी उपस्थित होते. हभप पुरुषोत्तम महाराज म्हणाले, गुरूचे आद्य कर्तव्य म्हणजे साधकाला मार्गदर्शन करणे हे होय.

हे मार्गदर्शन घेऊन परमार्थाच्या पथावर प्रगती व्हावी म्हणूनच गुरूचे पाय धरावयाचे असतात. परमार्थात श्रवण व सदगुरू यांना फार महत्त्व आहे. सदगुरूंशिवाय गती नाही, तर श्रवण हा परमार्थाचा पायाच आहे. सदगुरू मुखातून शुद्ध श्रवण घडल्याशिवाय साधकाच्या अंत:करणात नामाची गोडी निर्माणच होत नाही. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हभप प्रा. ज्ञानेश्वर गाडगे यांनी केले. प्रभारी मुख्याध्यापिका स्नेहल पगार यांनी आभार मानले.

### आत्मदर्शनासाठी गुरुकडे जाणे गरजेचे

» हभप प्रमोद महाराज जगताप म्हणाले, ज्ञान पाहिजे असेल तर गुरु जवळ जावे लागते. गुरु देती ज्ञान दर्शनी समाधान.. असे त्यांनी गायकवृंदाना आत्मियतेने सांगितले आहे. गायनाचा प्रवास आरोह- अवरोह होतो. परंतु, अभिजात ज्ञान मिळवल्यानंतर संगीताचा प्रवास गायक गाईल तो राग तयार होतो. ज्ञानग्रहण करण्यासाठी किंवा आत्मदर्शन होण्यासाठी गुरुकडे जाणे गरजेचे आहे.